Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000, www.unishivaji.ac.in

## विद्यार्थी विकास विभाग

Dr. P. T. Gaikwad
Director, Students' Development
Phone – (0231) 2609175, 2609475
Email: dsw@unishivaji.ac.in

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/ 1976 दि. 13/01/2024

प्रति,
मा. अधिविभागप्रमुख/संचालक,
सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय:— "शिवस्पंदन २०२४" नियमावली पाठवणेबाबत.**

संदर्भ :— १) या विभागाचे संदर्भ क्र. १९३७ दि.१९/१२/२०२३ रोजीचे पत्र.
२) या विभागाचे संदर्भ क्र. १९५९ दि.०१/०१/२०२४ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार या विभागामार्फत "शिवस्पंदन" कार्यक्रमामध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यासाठी लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे व त्यानुसार सहभागी नोंदणी करण्याबाबत कळवले आहे. त्या अनुषंगाने "शिवस्पंदन" कार्यक्रमाची नियमावली सोबत जोडून पाठवित आहे. सदरची नियमावली विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावी, तसेच आपल्या अधिविभागाच्या नोटीस बोर्डवर विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी लावण्यात यावी व **"शिवस्पंदन"** कार्यक्रमामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत करावे ही विनंती.

तसेच "शिवस्पंदन" कार्यक्रमासाठी ऑनलाईन नाव नोंदणी करण्याची मुदत उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार दि.१५ जानेवारी, २०२४ पर्यंत कळविण्यात आली होती. सदर मुदत दि. २० जानेवारी २०२४ पर्यंत वाढवण्यात आली आहे याची कृपया नोंद घ्यावी व सदरची बाब आपल्या अधिविभागाच्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणवी.

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक
विद्यार्थी विकास

सोबत:— नियमावली

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ परिसर

# "शिवस्पंदन" कार्यक्रम

# नियमावली

# 2023-2024

डॉ. पी. टी. गायकवाड
संचालक
विद्यार्थी विकास

# विद्यापीठ परिसर “शिवस्पंदन” कार्यक्रम विविध स्पर्धा प्रकारांसाठी नियमावली

**1. समुहनृत्यः**

1. एका अधिविभागाने एकच संघ पाठवावयाचा आहे.
2. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या कलाकारांची संख्या जास्तीत जास्त 10 व कमीत कमी 6 असावी.
3. लोकनृत्याच्या प्राथमिक तयारीसाठी प्रत्येक संघाला 5 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
4. लोकनृत्य किमान 6 मिनिटांचे व कमाल 10 मिनिटांचे असावे. जास्तीत जास्त 30 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
5. अश्लील व बिभत्स प्रकारे लोकनृत्य सादर करणाऱ्या संघावर कडक कारवाई करण्यात येईल.
6. संघ मुलांचा, मुलींचा अथवा मुलामुलींचा असू शकेल.
7. नृत्याचे सादरीकरण झाल्यानंतर ताबडतोब सहभागी संघानेच रंगमंच रिकामा व स्वच्छ करून देणेचा आहे.

**2. लघु नाटीका :**

1. एका अधिविभागाने फक्त एकच संघ पाठवावयाचा आहे.
2. लघु नाटीका मराठी अथवा हिंदी भाषेत असावी.
3. स्पर्धक विद्यार्थ्यांची संख्या कमाल सहा आणि किमान तीन राहील.
4. साथीदारांची संख्या जास्तीत जास्त 3 असेल.
5. **सादरीकरणासाठी किमान 8 मिनिटे व कमाल 12 मिनिटे वेळ दिला जाईल.**
6. जास्तीत जास्त 30 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
7. नाटीकेमध्ये राष्ट्रीय व्यक्तींवर वा राष्ट्रीय तत्वांवर टीका तसेच चरित्र/चारित्र्य हनन आणि शारिरीक व्यंगावर टिका अशा बाबींचा समावेश असता कामा नये.
8. स्पर्धकांना रंगभूषा, वेषभूषा, प्रकाश योजना व पार्श्वसंगीत याचा वापर करता येईल.
9. सादरीकरणासाठी विषय ज्या त्या अधिविभागाने निवडावयाचा आहे. राष्ट्रीय एकात्मता, देशभक्ती, राष्ट्रप्रेम, अंधश्रध्दा निर्मुलन व सामाजिक समस्या अशा विषयांना प्राधान्य द्यावे. लघुनाटीका ही विनोदी, विडंबनात्मक, उपरोधात्मक असावी. मात्र ती टीकात्मक असू नये.
10. स्पर्धेचे मुल्यमापन विषयाची निवड, अभिनय, संरचना, प्रेक्षकावरील परिणाम इ. बाबींवर अवलंबून राहील.

3. मुकनाटय :

मुकनाटय म्हणजे शब्द विरहीत अभिनय, हावभाव, पवित्रा आणि मुद्रा अभिनय यातून अभिव्यक्त करावयाची कला आहे. एखादी कल्पना, विषय मांडणे अथवा गोष्ट सांगणे हे केवळ शारीरिक हालचालीतून त्यात व्यक्त केले जाते. मुकाभिनेत्याला सादरीकरणासाठी कोणत्याही वस्तूची किंवा स्टेज प्रॉपटींचा वापर करता येणार नाही.

1. एका अधिविभागाने फक्त एकच संघ पाठवावयाचा आहे.
2. मुकनाटय स्पर्धेत भाग घेणाऱ्या कलाकारांची संख्या किमान 3 आणि कमाल 6 अशी राहील.
3. साथीदारांची संख्या दोन पेक्षा जास्त असता कामा नये.
4. सादरीकरणासाठी प्रत्येक संघास किमान चार मिनिटांचा व कमाल पाच मिनिटांचा वेळ दिला जाईल. जास्तीत जास्त 30 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
5. स्पर्धेचा निकाल सर्वसाधारणपणे विषयाची निवड, सादरीकरणातील संकल्पना, रंगभुषा, पार्श्वसंगीत व प्रेक्षकांवर परिणाम इ. बाबींवर अवलंबून राहील.
6. संघ मुलांचा, मुलींचा किंवा मुलामुलींचा संमिश्र असू शकेल.

4. भारतीय **समूहगीत** :

1. एका अधिविभागाने फक्त एकच संघ पाठवावयाचा आहे.
2. समूहगीत हे भारतीय भाषेमध्ये असावे.
3. या स्पर्धेत तीन साथीदारांचा/ट्रॅकचा वापर करता येईल.
4. साथीदार वगळून संघात कमीत कमी 4 व जास्तीत जास्त 6 स्पर्धक असतील.
5. चित्रपटातील समुहगीतास परवानगी दिली जाणार नाही.
6. संघ मुलांचा, मुलींचा अथवा मुला–मुलींचा असू शकेल.
7. गायनाचे मुल्य लक्षात घेऊनच निर्णय दिला जाईल. तो वेशभूषा अथवा हावभाव यावर अवलंबून असणार नाही.
8. प्रत्येक संघाने एक समूहगीत सादर करावयाचे आहे.
9. समूहगीतांसाठी एकूण किमान 4 मिनिटे व कमाल 8 मिनिटे वेळ दिला जाईल. जास्तीत जास्त 30 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
10. साथीदारांनी गाणं म्हणू नये.

5. **एकल लोकवाद्य वादन** :

1. एका अधिविभागातून तीन विद्यार्थ्यांना भाग घेता येईल.
2. लोकवाद्यामध्ये 1 साथीदार घेण्यास परवाणगी आहे.फक्त स्पर्धकाचे वादय वाजवू नये.
3. वाद्य लावणेसाठी 3 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
4. सादरीकरणासाठी किमान 4 मिनिटे व कमाल 8 मिनिटे वेळ दिला जाईल. जास्तीत जास्त 30 सेकंद वेळ मान्य करता येईल. यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
5. लोकवाद्य हे महाराष्ट्रातील कोणत्याही भागातील चालेल.

6. नकला :

1. एका अधिविभागातून कमाल तीन विद्यार्थ्यांना भाग घेता येईल.

2. प्रत्येक स्पर्धकाला किमान 4 मिनिटे व कमाल 5 मिनिटे वेळ दिला जाईल. जास्तीत जास्त 15 सेकंदाचा अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल.

3. स्पर्धकास विविध आवाजाची व प्रसिध्द व्यक्तीच्या भाषणाची नक्कल करता येईल. यामध्ये चित्रपट सृष्टीतील व्यक्तीमत्वांचाही समावेश राहील.

7. सुगम गायन :

1. एका अधिविभागातून कमाल तीन विद्यार्थ्यांना भाग घेता येईल.
2. प्रत्येक स्पर्धकाला जास्तीत जास्त दोन साथीदार (एक पेटीवादक व एक तबला वादक) बरोबर घेता येईल किंवा ट्रॅक वापरता येईल.
3. प्रत्येक गायकाला किमान 4 मिनिटांचा व कमाल 6 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
4. स्पर्धकास जास्तीत जास्त 15 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिकचा वेळ लागल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद केला जाईल.
5. या स्पर्धेत भावगीत, भक्तीगीत, भजन, गझल आणि अभंग सादर करता येईल.
6. चित्रपटातील गीतास परवानगी असेल.
7. सुगम गायन कोणत्याही भारतीय भाषेत चालेल.

8. **एकल नृत्य (रेकॉर्ड डान्स)** :

1. एका अधिविभागातून कमाल तीन विद्यार्थ्यांना भाग घेता येईल.

2. प्रत्येक स्पर्धकाला किमान 4 मिनिटांचा व कमाल 6 मिनिटांचा वेळ दिला जाईल.

3 स्पर्धकास जास्तीत जास्त 15 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिकचा वेळ लागल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद केला जाईल.

4. प्राथमिक तयारीसाठी 5 मिनिटाचा वेळ दिला जाईल.

5. अश्लील व बिभत्स प्रकारे नृत्य सादर करणाऱ्या स्पर्धकावर कडक कारवाई करण्यात येईल.